

निडसोशी : सायबर वॉरियर्स म्हणून निवड झालेले विद्यार्थी.

# निडसोशीतील विद्यार्थ्यांची सायबर सुरक्षा जागृतीसाठी निवड

**संकेश्वर (पुढारी वृत्तसेवा) :** निडसोशी येथील एसएनजेपी पदवीपूर्व कॉलेज व क्विक हिल फाऊंडेशनतर्फे सिलेक्शन ऑफ वॉरियर्स ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत सहभागी झालेल्या निडसोशी येथील १६ विद्यार्थ्यांची सायबर सुरक्षा जागृतीसाठी निवड झाली आहे. प्रा. पवन हिरेमठ व प्रा. आनंद सोनार यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा पार पडली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले. एसएनजेपी एसएनएमएस ट्रस्टच्या या सायबर वॉरियर्स क्लबला चांगला प्रतिसाद मिळत आहे. सदर विद्यार्थी परिसरातील शाळा, महाविद्यालये आणि समाजातील विविध स्तरांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करुन ऑनलाईन फसवणूक, डिजिटल फ्रॉड आणि डेटा सुरक्षेसारख्या महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर जागृती करणार आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना प्राचार्य बी. एम. हालभावी आणि क्लब समन्वयकांचे मार्गदर्शन लाभले.